ई-चावडी प्रशिक्षणाचा लाभ घेऊन कर्मचाऱ्यांनी तांत्रिकदृष्ट्या सक्षम व्हावे - निलेश गटणे

मंगळवार, १६ एप्रिल, २०१३




गडचिरोली : ई-चावडी व ई-म्युटेशन प्रणाली प्रशिक्षणाचा लाभ घेऊन कर्मचाऱ्यांनी तांत्रिकदृष्ट्या सक्षम व्हावे, तसेच नागरिकांची कामे सुलभ व जलद गतीने करावित, असे आवाहन प्रभारी जिल्हाधिकारी निलेश गटणे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली तर्फे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या कॉम्प्युटर ऑपरेटिंग ॲड प्रोग्रामिंग असिस्टंट (कोपा) कक्षात राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम अंतर्गत राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (एनआयसी) यांनी विकसित केलेल्या ई-चावडी व ई-म्युटेशन प्रणालीचे प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उदघाटनाप्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

व्यासपीठावर उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्री. चौधरी, भूमी अभिलेख विभागाचे अधीक्षक के. एस. हट्टेकर, एनआयसीचे जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी एस. आर. टेंभुर्णे, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य के.डी. बुराडे, उपप्राचार्य सुरेश डोंगे उपस्थित होते.

या उपक्रमाविषयी माहिती देताना श्री. गटणे म्हणाले, महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांनी विकसित केलेली ई-चावडी व ई-म्युटेशन प्रणालीची अंमलबजावणी करून ई-चावडीच्या माध्यमातून तलाठी यांच्याकडील गाव नमूना 1 ते 21 चे संगणकीकरण करणे तसेच ई-म्युटेशनच्या माध्यमातून वेबबेस प्रणालीच्या सहाय्याने ऑनलाईन फेरफार घेण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. त्याकरीता जिल्ह्यातील तलाठी, मंडळ अधिकारी यांच्यासाठी या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्रणालीत काम करताना सुरूवातीला कर्मचाऱ्यांना काही अडचणी येतील, मात्र प्रशिक्षण योग्य प्रमाणे घेतल्यास अडचणी येणार नाहीत. सकारात्मक विचार ठेवल्यास या प्रणालीचे ज्ञान मिळण्यास मदत होईल. सर्वांनी तांत्रिकदृष्ट्या सक्षम झाल्यास नागरिकांची कामे सुलभ पद्धतीने करण्यास मदत होईल. या प्रशिक्षणात सर्व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेऊन प्रणालीच्या कार्याचे प्रशिक्षण घ्यावे, तसेच नागरिकांची कामे सुलभ व जलद गतीने करण्याकडे लक्ष द्यावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

श्री. हट्टेकर यांनी या प्रणालीच्या माध्यमातून जुन्या माहितीचा उपयोग करून 7/12 देण्याचे कार्य सोपे होणार असल्याचे सांगितले. श्री. चौधरी म्हणाले, प्रशासन अधिक गतिशील व लोकाभिमुख करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे. या प्रशिक्षणाचा अधिकारी व कर्मचाऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या प्रशिक्षण कार्यक्रमात जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना एनआयसीचे जिल्हा सूचना अधिकारी एस. आर. टेंभुर्णे, भूमी अभिलेखचे जिल्हा अधीक्षक के. एस. हट्टेकर, सह जिल्हा निबंधक बी.एन. गरूड, नायब तहसीलदार एम.जे. गणवीर, एन. राचेलवार, मंडळ अधिकारी एन. जे. वाथे, तलाठी ई. एस. चांदेकर, एस.एस. सिडाम, निदेशक विपीन मेश्राम प्रशिक्षण देणार आहेत. संचालन एस. आर. टेंभुर्णे यांनी केले. तर आभार श्री. डोंगे यांनी मानले.

'महान्यूज' मधील मजकूर आपण 'महान्यूज'च्या उल्लेखासह पुनर्मुद्रित केल्यास आम्हाला आनंदच वाटेल.